| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १०४ वा | सोमवार दिनांक २९ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## टीईटी पेपरफुटी म्हणजे विद्यार्थी-शिक्षकांच्या स्वप्नांवर घाला; दोषींवर कठोर कारवाई करा - डॉ. प्रतापसिंह पाटील

धाराशिव (प्रतिनिधी)- राज्यात वारंवार घडणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा आणि टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) पेपरफुटीच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली.

लाखो विद्यार्थी आणि शिक्षक वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षांची तयारी करतात. मात्र, पेपरफुटीसारख्या घटनांमुळे त्यांच्या मेहनतीची पायमल्ली होत असून त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरत आहे. शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात अशा प्रकारच्या घटना घडणे हे शासनाच्या अपयशाचे द्योतक असल्याचे त्यांनी म्हटले. टीईटी पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय आणि सखोल चौकशी करून या गैरप्रकारामागील मुख्य सूत्रधारांसह संबंधित सर्व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था आणि प्रभावी नियंत्रण यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांचे भविष्य, शिक्षकांचा सन्मान आणि शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता जपण्यासाठी शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत आणि पेपरफोडीच्या रॅकेटचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणीही डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली.

## मोहरम शांतता, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात संपन्न



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव शहरातील जागीरदारवाडी रोड, गडदेवदरी येथील इमाम बारगाह मौला अली अब्बास (अ.स.) - दरबार मोठे पीर येथे मोहरम २०२६ निमित्त आयोजित करण्यात आलेले सर्व धार्मिक कार्यक्रम श्रद्धा, शिस्त आणि भक्तिमय वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. इमाम बारगाह मोहरम कमिटीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांमध्ये सर्व समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा आदर्श घालून दिला.

मोहरमच्या विविध दिवसांमध्ये आलम शरीफची स्थापना, चादर चढविणे, परचम कुशाई, अलाव, आलम इस्तकबाली, मौला अब्बास (अ.स.) यांची सवारी, जियारत-ए-फातेहा, शरबत व नियाज (लंगर) यांसह विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने पार पडले. संपूर्ण परिसरात या हुसेनच्या घोषणांनी धार्मिक वातावरण भारावून गेले होते. सर्व कार्यक्रम शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडल्याने उपस्थित भाविकांनी समाधान व्यक्त केले.

**करबला – सत्य, न्याय आणि मानवतेसाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची प्रेरणा**

मोहरम हा इस्लाम धर्मातील केवळ शोकाचा महिना नसून सत्य, न्याय, मानवता, संयम आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाचा संदेश देणारा पवित्र महिना आहे. इ.स. ६८० मध्ये इराकमधील करबला येथे पैगंबर हजरत मोहम्मद (स.) यांचे नातू इमाम हुसेन (अ.स.) यांनी अत्याचारी यजीदच्या अन्यायकारक सत्तेसमोर झुकण्यास नकार दिला. पाणी व अन्नाचा पुरवठा बंद असतानाही त्यांनी आपल्या कुटुंबीयांसह आणि ७२ सहकाऱ्यांसह सत्य आणि मानवतेच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले. म्हणूनच करबला हे जगभरातील मानवजातीसाठी अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची, सत्याचा मार्ग स्वीकारण्याची आणि मानवतेचे रक्षण करण्याची अमर प्रेरणा मानले जाते.

मोहरम उत्सवादरम्यान सर्व समाजातील नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करत शांतता, बंधुता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. धार्मिक कार्यक्रमांमध्ये विविध समाजातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतल्याने एकता, मानवता आणि बंधुभाव यांचे सुंदर दर्शन घडले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इमाम बारगाह मोहरम कमिटी, सर्व समाजातील नागरिक, स्वयंसेवक, यांनी मोलाचे सहकार्य केले. कोणताही अनुचित प्रकार न घडता संपूर्ण मोहरम उत्सव शांततेत, उत्साहात आणि धार्मिक श्रद्धेच्या वातावरणात पार पडल्याने सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## सामाजिक सुधारणांचे आधारस्तंभ राजर्षी छत्रपती शाहू महाराज –प्रा. डॉ. गोविंद कोकणे



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-येथे दिनांक २६ ६ २०२६ रोजी आस बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्या वतीने नालंदा फॅशन डिझायनिंग कॉलेज गोरे कॉम्प्लेक्स विसर्जन विहीर धाराशिव येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदकुमार गवारे माजी अध्यक्ष मराठा सेवा संघ धाराशिव प्रमुख पाहुणे ,व्याख्याते प्राध्यापक डॉक्टर गोविंद कोकणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव शिक्षणतज्ञ एमडी देशमुख कॅप्टन बी बी बागल डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे अध्यक्ष डॉ प्रा रवी सुरवसे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदकुमार गवारे यांचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे मारुती पवार यांनी शाल पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला प्रमुख पाहुणे व व्याख्याते प्राध्यापक डॉक्टर गोविंद कोकणे यांचा सत्कार प्राध्यापक अंबादास कलासरे यांनी शाल पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन केला

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त विजय गायकवाड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र अंगारखे यांनी केले

यावेळी बोलताना प्राध्यापक डॉक्टर गोविंद कोकणे म्हणाले की भारतीय सामाजिक सुधारणांचे आधारस्तंभ राजर्षी छत्रपती शाहू महाराज आहेत त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणास अग्रस्थान देऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अनेक वसतिग्रहाची स्थापना केली शेतकऱ्यांसाठी राधानगरी धरण बांधले २६ २६ जुलै १९०२ साली संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के जागा आरक्षित केल्य छत्रपती शाहू महाराजांनी वेदोक्त प्रकरणात परखड भूमिका घेतली होती स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही तत्वे संस्थांमध्ये त्यांनी रुजवली या तत्त्वांचा अवलंब डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये केला आहे राणी व्हिक्टोरिया यांनी राजश्री छत्रपती शाहू महाराजांना महाराजांचे महाराज ही पदवी बहाल केली होती आपल्या ४८ वर्षांच्या कालावधीत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये अमुलाग्र बदल केला होता इंग्लंड मधील जनता असे म्हणते की आम्ही आमचे राष्ट्र सोडू पण शेक्सपियरचे साहित्य आम्ही सोडणार नाही अशीच भूमिका भारतीयांनी संविधानांच्या बाबतीमध्ये घ्यायला हवी कारण भारतीय संविधानामुळेच आजपर्यंत भारत राष्ट्र म्हणून टिकून आहे वा आपण नागरिक म्हणून सुरक्षित आहोत .

अध्यक्षीय समारोपात नंदकुमार गवारे यांनी संत कबीराच्या वचनाचा दाखला देत सध्याच्या भीषण वास्तवाची जाणीव करून दिली कोल्हापूर संस्थानांमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थी गैरहजर राहिल्यास पालकांना दंड आकारण्याचे धोरण अवलंबले होते ते शाहू महाराजांचे धोरण कुठे आणि आजच्या शिक्षणाची अवस्था काय आहे ?आजचे शिक्षण सर्वसामान्यांना परवडणारे आहे काय? आज पटसंखेच्या नावाखाली शाळा बंद केल्या जात आहेत हे धोरण योग्य नाही आज बहुजनामध्ये सामाजिक जाणी्वा विसरून उच्चभ्रू होण्याची स्पर्धा वाढली आहे याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली आपण वैचारिक दृष्ट्या छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले ,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सशक्त आहोत तेव्हा यापुढे समाजातील मतभेद बाजूला सारून एकीची वज्रमुठ बांधू या व अन्यायाच्या विरोधात लढा उभा करू या अशी भूमिका मांडली

कार्यक्रमाचे आभार मारुती पवार यांनी मांडले कार्यक्रमास बालाजी तांबे, अशोक सावंत, प्राचार्य डॉक्टर मुकुंद गायकवाड, एन एल गोरसे, सुदेश माळाले, प्रा राम चंदनशिवे, एम डी जानराव, पृथ्वीराज चिलवंत, विकास काकडे, उमाकांत कुलकर्णी,अशोक बनसोडे, प्रभाकर बनसोडे ,नितीन माने ,सिकंदर पटेल ,दीपक कांबळे, सजीयोदिन शेख, रमेश कांबळे ,सुरेश शेळके, एडवोकेट अजित कांबळे,अमोल गडबडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे पदाधिकारी, सदस्य ,शहरातील

नागरिकांची उपस्थिती होती

## क्राईम न्युज

### ऊसात केला लैंगीक अत्याचार

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत २८ वर्षीय महिला दि.०६.०३.२०२६ रोजी हीस एका गावातील एका तरुणानी तुझे अंघोळ करतानाचे छायचित्रीकरण व्हायरल करीन अशी धमकी देवून शेतात ऊसात नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. पिडीतेने फोन करु नको तुझे विरुध्द पोलीसात तक्रार करील असे म्हणाले असता नमुद तरुणानी जातीवाचक शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ३५१(२)(३) सह अ.जा.ज.अ. प्र. अधिनियम कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हि) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यधुंद अवस्थेत मोटारसायकल चालविल्याने गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अरुण वय २८ वर्षे, रा. डोकेवाडी ता. भुम जि. धाराशिव, विकास , वय ४० वर्षे, रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव, बाजीराव वय ५६ वर्षे, रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव हे दि.२५.०६.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे मोटरसायकल क्र एमएच २५ बीई १८७४, मोटरसायकल क्र एमएच २५ ए.व्ही ६७३६व मोटरसायकल क्र एमएच २५ ए.एन ६८६३ ही वाहने CbCM ५२ रोडवर वाशी फाटा, वाशी शहरात तांदुळवाडी रोडवर वाशी बाजारतळ येथे व एनएच ५२ रोडवर सरमकुंडी येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम- १८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द वाशी पो ठाणे येथे स्वंतत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत.

### पिकअप रस्त्यावर उभा केल्याने गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गतपांडुरंग म वय २५ वर्षे, रा. कुंबेफळ ता. परंडा जि. धाराशिव, निशिकांत रामहारी गरडे, वय ३६ वर्षे, रा. उपळाई ता. बार्शी जि. सोलापूर यांनी दि.२५.०६.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे पिकअप क्र एमएच २५ ए.जे. ९८१९ व पिकअप क्र एमएच २६ व्ही ५६२३ ही वाहने आनाळा ते परंडा रोडवर प्रितम मंगल कार्यालय समोर परंडा येथे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परंडा येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द परंडा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवले आहेत.

### ४६१ कारवाया करुन 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२६ जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४६१ कारवाया करुन ४,५१,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## पालिका सिओंच्या रिकाम्या खुर्चीला साडी-चोळीसह बांगड्यांचा आहेर



तुळजापूर (प्रतिनिधी)-शहरातील गट नं. १३८/१ मधील कथित बेकायदेशीर विकासकामे, अनधिकृत बांधकामे आणि संशयास्पद खरेदी-विक्री व्यवहारप्रकरणी कारवाईच्या मागणीसाठी नगरपालिका कार्यालयात जोरदार घोषणाबाजी केली. या वेळी मुख्याधिकारी अनुपस्थित असल्याने संतप्त महिलांनी साडी-चोळी, बांगड्यांनी मुख्याधिकाऱ्यांचा खुर्चीची ओटी भरून निषेध केला. नगरसेविका प्रगती लोंढे यांच्या पुढाकाराने गुरुवारी (दि. २५) नगरपालिका कार्यालयात आंदोलन करण्यात आले.

या वेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात २६ जणांविरोधात तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. गट क्रमांक १३८/१ मधील सुमारे २ हेक्टर ६३ आर जमिनीवर बेकायदेशीर विकास आराखडा तयार करून खरेदी-विक्री व्यवहार करण्यात आले असून, अनधिकृत बांधकामे व पत्र्याचे गाळे उभारण्यात आल्याचा आरोप केला आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी स्तरावरील सात सदस्यीय समिती तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने नियुक्त पाच सदस्यीय समितीच्या चौकशी अहवालांमध्ये मंजूर भू-अभिन्यास आणि खरेदीखतासोबत जोडलेल्या आराखड्यात तफावत असल्याचे नमूद करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित व्यवहार रद्द करून अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. आंदोलनात काँग्रेसचे नगरसेवक आनंद जगताप, रणजित इंगळे, अक्षय परमेश्वर, चिन्मय मगर, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख अमोल जाधव यांच्यासह तुळजापूर परिसरातील महिला व नागरिकांनी सहभाग नोंदवला.

पालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे बदलीच्या प्रयत्नात दरम्यान पालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांचा मुंबई वाऱ्या वाढल्या असून, मुख्याधिकारी रणदिवे बदलीचा प्रयत्नात असल्याची पालिका वर्तुळात चर्चा आहे. विशेष म्हणजे मुख्याधिकारी रणदिवे सुरूवातीपासूनच नाराज असले तरी गेल्या ०६ महिन्यापासून पालिकेत बजेट नसल्याने मुख्याधिकारी रणदिवे यांचा नाराजीत वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे.

## हासेगावमधील १०० महिलांना सोयाबीन बियाणांचे वाटप:नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशनतर्फे महिला शेतकऱ्यांना आधार



कळंब (प्रतिनिधी)-मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आर्द्रानेे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या आहेत. मागील दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्यामुळे मशागत करून पेरणीच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्यातच कळंब तालुक्यातील हासेगाव येथे नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशनच्या वतीने १०० महिलांना सोयाबीन बियाणांचे वाटप करण्यात आले आहे. तालुक्यातील हासेगाव (के.) नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशनच्या विद्यमाने तसेच लोक पर्याय डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या बचत गटातील सदस्यांसाठी आयोजित कार्यक्रमात कळंब तालुक्यातील आडसूळवाडी, कोठाळवाडी, जवळा खुर्द, खामसवाडी आणि मोहा येथील १०० महिला सदस्यांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक एकल महिला संघटनेच्या प्रमुख कल्पना जतकर यांनी केले. सूत्रसंचालन संघटनेच्या अध्यक्षा सुनंदा खराटे यांनी केले. त्यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. अविनाश घोडके यांनी आभार मानले.

महिलांनी स्वावलंबी व्हावे या वेळी प्रमुख मार्गदर्शन करताना पर्याय फाउंडेशनचे प्रमुख विश्वनाथ तोडकर म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी पर्याय फाउंडेशन सातत्याने कार्यरत आहे. महिलांवर कोणतीही आर्थिक अडचण आली तरी त्यांना कधीही एकटे सोडणार नाही. महिलांनी स्वावलंबी व्हावे, शेती व बचतीच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी नाम फाउंडेशन व पर्याय फाउंडेशन विविध उपक्रम राबवत आहे. भविष्यातही प्रत्येक संकटात आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.

## ८० एमएमच्या १२ पट्ट्या व कॉपर स्ट्रीपच्या ६ पट्ट्या असे एकुण ७०,००० किंमतीचा मुद्देमाल चोरला

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : दि.२१.०६.२०२६ रोजी २३.०० ते दि. २२.०६.२०२६ रोजी १०.०० वा. सु. कडदोरा शिवारात असेन्स रिन्युयबल प्रा.लि. सोला कंपनी मधील ५५,००० अपर कंपनीचे ०६ एम.एम. डी.सी. रेड ब्लॅक केबल,स्पलाय ऑफ ट्रान्सफार्मर स्पेअर अर्थ बसबार टीन्ड कॉपर बसबार कंपनीचे ८० एमएमच्या १२ पट्ट्या व कॉपर स्ट्रीपच्या ६ पट्ट्या असे एकुण७०,००० किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला. एकुण ५,२०० मिटरचे तुकडे केरुन नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- विनोद मधुकर रणखांब, वय २९ वर्षे, रा. कडदोरा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२५.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भेसळ व गुटखा यावरच चर्चा होत आहे

राज्यात आता भेसळ प्रकरणे उघडी पडत आहेत व मोठ्या प्रमाणता गुटखा पकडला जात आहे. या दोन प्रकरणाने राज्यात चर्चेला उधाण आले आहे. वास्तविक दोघावरही बंदी आहे. तरी राजरोसपने हा गैरधंदा केला जात आहे. कोणाचे अभय आहे हे कळून येत नाही. र्निभयपने ह्या बाबी चालू आहेत हे उघड आहे. वास्तविक भेसळीचे प्रकरणे तुकाराम मुंडे यांच्या हाती या खात्याचा कारभार आल्याने धडाक्यात कारवाई सुरु केली आहे. अनेकांनी चुकीचा व्यवसाय बंद केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत. मुळात खाद्य पदार्थ जे दुधापासून बनतात तेवढे दुधाचे उत्पादन होत नाही. दुधजन्य पदार्थ दुप्पट बाजारात मिळते आहे. सध्याला गायी-म्हसीचे प्रमाण कमी झाले आहे. तरी दुधापासून अनेक उत्पादने बाजारात विपुल प्रमाणात मिळतात. या बाबत कोनोसा घेतल्यास काही दुधजन्य पदार्थ भेसळीचे आहेत हे उघडे पडत आहे. भेसळ ओळखणे हे जनसामान्यांचे काम नाही किंवा त्यांना ओळखता येत नाही. यासाठी राज्य शासनाचा अन्न व भेसळीचा विभाग आहे. जिल्हास्तरावर कार्यालये आहेत. त्यांची कामे भेसळ होत असेल, जनतेच्या जीवाशी कोणी खेळ खेळत असेल तर त्याला रोखणे हा आहे. जसे औषधी दुकानात तारीख बाद झाली तर ती विकू न देणे, जप्त करणे, अन्नातून भेसळ करीत असेल तर रोखणे आदि महत्वाची कामे होतात. विशेष करून दुधजन्य पदार्थात मोठी भेसळ होते हे आता उघडे पडले आहे. ठराविक जनतेच्या ताटातविष कालविण्याचे काम होते आहे. अन्ना बरोबर फळाचे सुद्धा असेच होत आहे. फळ लवकर पिकावे म्हणून केमिकल्सचा किंवा इंजेक्शनचा वापर केला जात असल्याचे प्रकरणे उघडी पडली आहेत. मुळात भेसळ करणाऱ्यावर कडक कारवाई होत नाही. त्यामुळे भिती उरली नाही. तपास जलद गतीने होत नाही. तपासात दिरंगाई होते. त्याच प्रमाणे यातून निर्दोश सुटण्याचे प्रकार अधिक होतात. वास्तविक राज्यात मोठ्या प्रमाणात भेसळ होते हे सरकारला माहिति असले पाहिजे. सरकारकडे मोठ्या प्रमाणात माहितीची यंत्रणा असते. अन्न व भेसळ वाल्यांना कोठे भेसळ होते हे चांगले माहिति असते. त्यांचे ते कामच आहे. आता पर्यंत हा विभाग झोपलेला होता. आता तुकाराम मुंडे यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर बरीच प्रकरणे उघडी पडली आहेत. हा जनतेचा आशिर्वाद तुकाराम मुंडे घेत आहेत. अन्नात विष कालविण्याचे काम होत होते. हे आता जतनेला कळून आले आहे. बऱ्याच बाबी अशा आहेत की, त्यात सहज भेसळ करणे शक्य आहे. हे प्रशासनला माहिति नाही असे होत नाही. सर्व माहिती असताना गैरप्रकाराने अशी प्रकरणे झाकली जातात ही बाब जतनेला देखिल माहिती आहे. मुळात सर्वत्र दुषीत वातावरण आहे. तरी त्याला आडविले जात नाही किंवा रोखले जात नाही. भेसळ दुध जन्मलेल्या मुलीस दिले जात असेल तर सर्वात मोठे पाप आहे. मुळात अधिक कमाईच्या नादात इतरांचे आरोग्य धोक्यात टाकले जात आहे. मुळात देशात केमिकल्सचा वापर अधिक प्रमाणात होत आहे. पुर्वी पेक्षा रासायनिक पदार्थ अधिक वापरली जात आहेत हे उघड आहे. इतर बाबत भेसळ होते असेल तर दुर्लक्ष करू मात्र अन्नात भेसळ होत असेल तर जनता खपवुन घेणार नाही. वास्तविक आता कोठे शुद्ध वस्तू मिळतात असे नाही, सर्व अशुद्ध व भेसळीचे पदार्थ घ्यावे लागत आहे. साधे व सोपे गणित असे आहे की, जनतेला लागणाऱ्या वस्तु ह्या आरोग्यास धोकादायक नसाव्यात असे वाटत असले तरी समाजात विघातक शक्ती कार्यरत असते ती भारतीयांचे आरोग्य बिघडावे, प्रजनन शक्ती कमी व समाप्त व्हावी असे केमिकल्स काही बाबतीत मिसळून देत असल्याचे उघड झाले होते. मुळात भेसळ आहे का नाही हे ओळखण्याचे ज्ञान सामान्य नागरिकांना नसते. ते केवळ अन्न व भेसळ कार्यालयातील कर्मचारी ओळखू शकतात. त्यामुळे यापुढे जनतेला भेसळ ओळखण्यासाठीचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. प्रत्येकात भेसळ आहे का नाही हे ओळखण्याचे ज्ञान दिले तर भारतीयांचे आरोग्य सदृढ राहील. देशाची खरी संपत्ती ही निरोगी जनता आहे. बलशाली जनता आहे हे लक्षात ठेवावे. जनताच रोगी असेल व शत्रुला लढण्याची ताकद संपते तर देश सुरक्षित राहु शकत नाही. सर्वात महत्त्वाचे कार्य हे भेसळजन्य पदार्थ जनतेला खावु न घालणे हा आहे. किती पदार्थात भेसळ केले गेले हे आता उघडे पडत आहे. कोणत्या पदार्थात सहज भेसळ करता येते इे घडत झाले आहे. या बाबत जनतेच्या सुरक्षितेबाबत तुकाराम मुंडे काम गौरवशाली आहे हे मान्यच केले पाहिजे. जसे भेसळीचा प्रकार होतो तसे गुटखा बंदी असून  मिळत आहे. या बाबत यश किंवा अपयश कोणाचे आहे याचा विचार केला पाहिजे. गुटखा बंदी आहे. कारखाने बंद केली गेली आहेत मग गुटखा मिळतो कसा वास्तविक गुटखा हा परराज्यातून येतो तोही चोरट्या मार्गाने येत आहे. महाराष्ट्रात गुटखा बंदी आहे मात्र इतर राज्यात गुटखा उत्पादित होते तेथून येत आहे. गुटखा हा चोरट्या मार्गाने राज्यात येताना अनेकदा पकडले जाते. यावर कडक कारवाईची गरज आहे. गुन्हेगारास कडक शिक्षेची तरतुद असली पाहिजे. सध्याला काय होते, गुटखा पकडला की, जप्त केला जातो. व्यक्तीला या बाबत शिक्षा कडक होणे अपेक्षित आहे. तरच पायबंद बसेल. नसता या बाबत कडक कारवाई होत नसल्याने गुटखा सहज मिळतो आहे. या बाबत पोलिस यंत्रना सतर्क राहीली पाहिजे. वास्तविक पाहाता भेसळ असो किंवा गुटखाबाबत जनताच जागृत असली पाहिजे. जनतेनी आता  भेसळ करणाऱ्यास व चोरून गुटखा विकणाऱ्यावर लक्ष ठेवुन  प्रशासनास कळविले पाहिजे. नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. केवळ सरकार किंवा प्रशासन या बाबत लक्ष देवुन कारवाई करेल असा विचार करू नये. जनता व प्रशासन मिळून भेसळ व गुटख्यावर प्रहार केल्यास हे सहज हद्दपार होवू शकतात. गुटखा खाणे आरोग्यास धोकदायक आहे. असे असताना तो चघळला जातो. अनेक पान टपऱ्यावर मिळतो. शाळेजवळ पान टपऱ्या नसाव्यात असे निर्देश असताना आजही शाळा व धार्मिकस्थळाजवळ पानटपरी आहेत. तुकाराम मुंडे यांच्या भितीपोटी पानटपऱ्या बंद आहेत. त्यामुळे बंद असणाऱ्या टपऱ्यामधुन गुटखा सहज मिळतो असे समजणे चुकीचे नाही. काही झाले तरी आता जनतेनी जागृत राहुन याबाबत लढा दिला पाहिजे. समाजासाठी घातक असल्याला बाबी जडीपार केल्या पाहिजे हे लक्षात ठेवेल पाहिजे.

# बळीराजाला देतेय बळ..

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

महाराष्ट्रातील बळीराजाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्याला पुन्हा एकदा स्वाभिमानाने उभे करण्यासाठी राज्य शासनाने नुकतेच ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना जाहीर करण्यात आली असून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' असे या योजनेचे नाव आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**३६ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेची कर्जमुक्ती**

या योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी मंजूर केली आहे. या अवाढव्य आर्थिक तरतुदीमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि शेती क्षेत्राला गती देण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

**योजनेचे मुख्य निकष आणि लाभ**

२ लाखांपर्यंत कर्जमाफी: ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या पात्र शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिली जाणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन:**

जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून शासनाने विशेष तरतूद केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा: जुन्या कर्जाच्या बोज्यातून मुक्त झाल्यानंतर, शेतकऱ्यांना आता खरीप आणि रब्बी हंगामासाठी नव्याने पीक कर्ज मिळणे अत्यंत सोपे होणार आहे.




जमीनधारणेची अट नाही: या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लाभ देताना 'वैयक्तिक शेतकरी' हाच एकमेव निकष मानला गेला आहे. जमीनधारणेचा (जमिनीच्या क्षेत्राचा) कोणताही विचार न करता प्रत्येक पात्र शेतकऱ्याला या योजनेचा लाभ दिला जाईल.

**सुलभ प्रक्रिया: स्वतंत्र अर्जाची गरज नाही!**

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून शासनाने प्रक्रिया अत्यंत सुलभ ठेवली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कोणताही स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फक्त आधार प्रमाणीकरण (Aadhar Authentication) पूर्ण करणे बंधनकारक असेल. आधार प्रमाणीकरण होताच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीचा लाभ वर्ग केला जाईल.

**प्रभावी अंमलबजावणीसाठी उपसमितीची स्थापना**

योजनेचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शकपणे आणि वेळेत पोहोचावा, यासाठी एका विशेष उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

आर्थिक अडचणींमुळे खचलेल्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा शेतात आत्मविश्वासाने उभे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' मुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांची चिंता मिटली असून, बळीराजा पुन्हा एकदा नव्याने समृद्धीच्या वाटेवर वाटचाल करण्यास सज्ज झाला आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती आधिकारी, ठाणे**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन

**महाराष्ट्र** शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' चा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.




योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करुन नियमानुसार विहित वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एक रक्कमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे थकीत पीक कर्ज असल्यास, शासनाच्या निकषांमध्ये बसणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार असल्याची माहिती श्री. पोतंगले यांनी दिली. माहिती अपूर्ण असल्यामुळे कोणताही पात्र शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद पूर्ण करावी. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## आठवडाभर साखर आणि मीठ पूर्णपणे बंद केलं तर शरीरात काय बदल होतात?

अलीकडच्या काळात फिटनेस आणि निरोगी जीवनशैलीबाबत लोकांमध्ये जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अनेकजण साखर आणि मीठ कमी करण्याचा किंवा पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतात. जास्त प्रमाणात साखर आणि मीठ खाल्ल्याने लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारांचा धोका वाढू शकतो, हे अनेक संशोधनांमधून समोर आलं आहे.

पण जर एखाद्या व्यक्तीने फक्त एक आठवड्यासाठी साखर आणि मीठ पूर्णपणे बंद केलं, तर शरीरात नेमके कोणते बदल होऊ शकतात? याबाबत तज्ज्ञांनी काही महत्त्वाची माहिती दिली आहे.

एक आठवडा साखर बंद केल्यावर काय होऊ शकतं?

१. गोड खाण्याची सवय कमी होऊ शकते

पहिले दोन ते तीन दिवस गोड खाण्याची तीव्र इच्छा होऊ शकते. कारण शरीराला साखरेची सवय झालेली असते. मात्र, हळूहळू ही इच्छा कमी होऊ लागते आणि शरीर कमी गोड खाण्याशी जुळवून घेतं.

२. शरीरातील ऊर्जा स्थिर राहू शकते

रिफाइंड साखर बंद केल्याने रक्तातील साखरेची पातळी वारंवार वाढणं आणि कमी होणं कमी होतं. त्यामुळे दिवसभर ऊर्जा टिकून राहते आणि अचानक थकवा किंवा सुस्ती जाणवत नाही.

३. वजन कमी होण्यास मदत होऊ शकते

साखरेमुळे शरीरात अतिरिक्त कॅलरीज जमा होतात. साखर कमी केल्याने या अतिरिक्त कॅलरीज कमी होतात आणि शरीरात चरबी साठण्याचं प्रमाणही कमी होऊ शकतं.

एक आठवडा मीठ बंद केल्यावर काय होऊ शकतं?

१. शरीरातील सूज कमी होऊ शकते

जास्त मीठ खाल्ल्यामुळे शरीरात पाणी साचून राहतं. मीठ कमी केल्यावर हे अतिरिक्त पाणी बाहेर पडण्यास मदत होते. त्यामुळे सूज कमी झाल्यासारखी जाणवू शकते.

२. रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते

ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांच्यासाठी मीठाचं प्रमाण कमी करणं फायदेशीर ठरू शकतं. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत मिळू शकते.

३. कमजोरी आणि थकवा जाणवू शकतो

मात्र, मीठ पूर्णपणे बंद करणं प्रत्येकासाठी योग्य नाही. मिठामध्ये असलेलं सोडियम शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतं. अचानक मीठ बंद केल्यास काही लोकांना चक्कर येणं, अशक्तपणा, डोके हलकं वाटणं किंवा थकवा जाणवू शकतो.

साखर आणि मीठ पूर्णपणे बंद करणं योग्य आहे का?

तज्ज्ञांच्या मते, रिफाइंड साखर कमी करणं फायदेशीर ठरू शकतं. मात्र, मीठ पूर्णपणे बंद करणं प्रत्येकासाठी योग्य नाही. कारण शरीराला योग्य प्रमाणात सोडियमची गरज असते.

त्यामुळे आहारात कोणताही मोठा बदल करण्यापूर्वी डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणं आवश्यक आहे. विशेषतः ज्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनीचे आजार किंवा इतर आरोग्यविषयक समस्या आहेत, त्यांनी स्वतःहून असे प्रयोग करू नयेत.

## कडू कारल्याला द्या चविष्ट ट्विस्ट! भरलेले कारले ते पनीर कारल्यापर्यंत १० भन्नाट रेसिपी



कारल्याचे नाव ऐकताच अनेक जण नाक मुरडतात. विशेषतः लहान मुलांना तर कारले अजिबात आवडत नाही. मात्र योग्य पद्धतीने बनवल्यास हेच कारले चवदार आणि पौष्टिक पदार्थात रूपांतरित होऊ शकते. कारल्यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, लोह आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ते आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. विशेषतः मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी कारले उपयुक्त मानले जाते.

अनेकांना वाटते की कारल्याची फक्त एक-दोन प्रकारची भाजी बनवता येते. पण प्रत्यक्षात कारल्यापासून अनेक स्वादिष्ट आणि पौष्टिक पदार्थ तयार करता येतात. भरलेले कारले, कांदा-कारले, कारले-पनीर, कारले-काजू आणि कारले-नारळ अशा विविध रेसिपी घरच्या घरी सहज बनवता येतात.

कारल्याची कडवट चव कमी करण्यासाठी काही सोपे उपायही करता येतात. कारले कापून त्यावर मीठ लावून २० ते ३० मिनिटे ठेवावे. तसेच हळद आणि मिठाच्या पाण्यात उकळल्यासही कडूपणा कमी होतो. कांदा, टोमॅटो, आमचूर आणि थोडासा गूळ वापरल्यास चव अधिक संतुलित होते.

सर्वात लोकप्रिय प्रकार म्हणजे कांदा-कारल्याची भाजी. यात कारले आणि कांदा बारीक कापून मसाल्यांसह मंद आचेवर परतले जातात. कांद्याच्या नैसर्गिक गोडव्यामुळे कारल्याची कडवट चव कमी होते.

भरलेले कारले हा आणखी एक लोकप्रिय प्रकार आहे. यामध्ये बडीशेप, धणे, आमचूर आणि इतर मसाले भरून कारले मंद आचेवर भाजले जाते. पोळी किंवा पराठ्यासोबत ही भाजी अतिशय स्वादिष्ट लागते.

कारले-बटाटा ही अनेक घरांमध्ये आवडीने बनवली जाणारी भाजी आहे. बटाट्यामुळे कारल्याची चव सौम्य होते. दोन्ही भाज्या वेगवेगळ्या तळून नंतर मसाल्यांसह शिजवल्यास त्याची चव अधिक खुलते.

कारले-टोमॅटोची भाजी देखील पौष्टिक आणि चविष्ट पर्याय आहे. टोमॅटोमधील आंबटपणा कारल्याची कडवट चव कमी करतो. ही भाजी कोरडी किंवा रस्सेदार अशा दोन्ही प्रकारे बनवता येते.

मसालेदार कारले मसाला हा खास प्रसंगी बनवण्यासारखा पदार्थ आहे. कुरकुरीत तळलेले कारले आणि मसालेदार ग्रेव्ही यांचा संगम या भाजीला वेगळीच चव देतो.

कारले-ढोबळी मिरचीची भाजीही चवीला भन्नाट लागते. ढोबळी मिरचीचा हलका गोडवा आणि कारल्याची खास चव यामुळे हा पदार्थ हेल्दी आणि लो-कॅलरी पर्याय ठरतो.

प्रोटीनयुक्त पदार्थ आवडणाऱ्यांसाठी कारले-पनीर हा उत्तम पर्याय आहे. मसालेदार ग्रेव्हीत पनीर आणि कारले एकत्र शिजवल्याने पौष्टिक आणि स्वादिष्ट भाजी तयार होते. ग्रामीण भागात कारले-वांगीची भाजी खूप लोकप्रिय आहे. वांगी आणि कारले मसाल्यांसह परतून बनवलेली ही भाजी पारंपरिक चवीचा अनुभव देते.

दक्षिण भारतीय शैलीतील कारले-नारळ भाजीही खूप प्रसिद्ध आहे. किसलेला नारळ, मोहरी आणि मसाल्यांच्या फोडणीमुळे या भाजीला वेगळीच चव मिळते. यामध्ये कारल्याचा कडूपणाही कमी जाणवतो.

कारले-काजू ही एक खास आणि श्रीमंत चवीची रेसिपी आहे. कुरकुरीत काजू, कारले, मसाले आणि थोडासा गूळ यांचा वापर करून तयार होणारी ही भाजी पाहुण्यांसाठीही उत्तम पर्याय ठरू शकते.

दररोजच्या जेवणात काहीतरी वेगळे आणि आरोग्यदायी खायचे असेल तर कारल्याच्या या दहा रेसिपी नक्की करून पाहा. योग्य पद्धतीने बनवलेले कारले केवळ चवदारच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते.

## रोज सकाळी रिकाम्या पोटी मेथीचं पाणी प्या; पचनाच्या समस्यांवर मिळू शकतो फायदा

आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असणारी मेथी ही फक्त मसाला नसून आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. अनेकजण मेथीचा वापर भाजी, पराठे किंवा विविध पदार्थांमध्ये करतात. मात्र, रोज सकाळी रिकाम्या पोटी मेथीचं पाणी पिण्याची सवय लावल्यास शरीराला अनेक प्रकारचे फायदे मिळू शकतात.

मेथीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे शरीराची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते. मात्र, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की मेथीचं पाणी हा कोणत्याही आजारावरील उपचार नाही, तर निरोगी जीवनशैलीचा एक भाग आहे.

**वजन नियंत्रणासाठी फायदेशीर**

सकाळी दिवसाची सुरुवात मेथीच्या पाण्याने केल्यास चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) सुधारण्यास मदत होऊ शकते. यामुळे भूक नियंत्रणात राहण्यास मदत मिळते आणि दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटते. संतुलित आहार आणि नियमित व्यायामासोबत मेथीचं पाणी घेतल्यास वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**पचनसंस्था मजबूत राहण्यास मदत**

मेथीमध्ये असलेले फायबर पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. रिकाम्या पोटी मेथीचं पाणी प्यायल्याने बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आणि पोट फुगण्याच्या समस्यांमध्ये काही प्रमाणात आराम मिळू शकतो. तसेच आतड्यांच्या आरोग्यासाठीही ते फायदेशीर मानले जाते.

## लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- २६ जून सामाजिक समतेचे पुरस्कर्ते सुधारणावादी लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचणारे, शिक्षण, आरक्षण व सामाजिक न्यायाचे क्रांतिकारी पुरस्कर्ते,सर्वसामान्यांच्या हृदयात चिरंतन स्थान मिळविणारे सामाजिक समतेचे पुरस्कर्ते सुधारणावादी लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांची जयंती संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा मंगरूळ या ठिकाणी, साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री ईश्वर क्षिरसागर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे केली. शेवटी सर्वांचे आभार अनिल गायकवाड सर याने मानले, आणि विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

यावेळी मदने सर श्री मेरत सर, गायकवाड सर, पाटील सर, श्रीमती घोडके मॅडम. शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती दत्तू मॅडम अधीक्षिका व सर्व, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या समवेत राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्याउत्साहात साजरी करण्यात आली.

## शेतकऱ्यांमध्ये नाराजी:वाशीतील ५४ हजार शेतकऱ्यांचे ३.५ कोटी रखडले; विमा भरपाई प्रलंबित



वाशी (प्रतिनिधी)-मागील वर्षी ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे वाशी तालुक्यातील खरीप पिकांसह शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले होते. अनेक भागांत पिके पाण्याखाली जाऊन पूर्णतः नष्ट झाली, तर काही ठिकाणी जमिनी खरवडून गेल्याने शेतीची सुपीकताही कमी झाली. या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून शेतकऱ्यांनी भरलेल्या पीक विम्याची रक्कम वर्ष उलटूनही मिळालेली नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. विमा कवच मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी भरलेली साडेतीन कोटीची रक्कम देखील कंपनीने गिळंकृत केल्याची भावना व्यक्त होत आहे.

खरीप २०२५ हंगामात तालुक्यात ४३ हजार ३८१ हेक्टरवर पेरणी झाली होती. त्यापैकी ४१ हजार ३७० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड होती. सुरुवातीला पिकांची स्थिती समाधानकारक आणि जोमदार वाढीची असतानाच १४ ऑगस्टपासून अतिवृष्टीला सुरुवात झाली. सलग दीड महिना कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे पिके, शेती आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतजमिनी खरवडून गेल्या, तर साचलेल्या पाण्यामुळे पिके कुजून सडली. काही भागांत शेतात आठ-आठ दिवस पाणी साचून राहिल्याने शेतकऱ्यांचे हाता-तोंडाशी आलेले पीक पूर्णपणे वाया गेले.

तालुक्यातील ५४ हजार १६४ शेतकऱ्यांनी ३१ हजार ८५० हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा भरला होता. यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः च्या वाट्याचे ३ कोटी ५३ लाख १२ हजार ५०८ रुपये भरले. मात्र इतके मोठे नुकसान होऊनही अद्याप विम्याची रक्कम मिळालेली नाही. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांचा संताप वाढत असून, शासन व विमा कंपनीच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यावर्षी जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस नसल्याने पेरण्या रखडल्या आहेत. पाऊस नसल्याने तीही अडचण वाढली आहे. मागील हंगामातील नुकसान, नवीन हंगामासाठी केलेली कर्जउसनवारी आणि वाढलेला खर्च यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत विम्याची रक्कम तातडीने मिळावी, अशी तीव्र मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

२२ पीक कापणी प्रयोगांवर कंपनीचे आक्षेप अतिवृष्टीनंतर झालेल्या नुकसानीची दखल प्रशासनाने घेतली होती. पंचनाम्यांमध्येही मोठे नुकसान नोंदविण्यात आले. तरीही विमा कंपनीने तालुक्यातील ३६ सोयाबीन पीक कापणी प्रयोगांपैकी २२ प्रयोगांवर आक्षेप नोंदवला आहे. शेतकरी संघटनांच्या मते, विमा नाकारण्यासाठी ही पळवाट काढण्यात आली आहे. प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीकडे दुर्लक्ष करून तांत्रिक कारणांवर भर दिला जात असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. त्यामुळे विमा वितरणाचा प्रश्न अधिकच लांबणीवर पडला आहे.

*..तर चक्का जाम आंदोलन करण्यात येईल अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची साक्ष संपूर्ण राज्याने पाहिली. प्रशासनाने पंचनामे केले, लोकप्रतिनिधींनी दौरे केले; मात्र विमा कंपनी पीक कापणी प्रयोगांच्या नावाखाली शेतकऱ्यांचा हक्काचा विमा रोखून धरत आहे. शेतकऱ्यांनी भरलेली साडेतीन कोटींची रक्कम आणि शासनाचा हिस्सा कंपनीकडे अडकला आहे. येत्या दहा दिवसांत नुकसानाच्या प्रमाणात सन्मानजनक विमा वितरित न झाल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन चक्का जाम आंदोलन करण्यात येईल. - गजानन भारती, स्वाभिमानी शेतकरी संघटना*

पेरणीपूर्वीच आर्थिक संकट यंदाच्या हंगामासाठी शेतकऱ्यांनी कर्ज, उसनवारी आणि स्वतःची बचत खर्च करून बियाणे व खते खरेदी केली आहेत. मात्र पाऊस नसल्याने पेरण्या रखडल्या आहेत. मागील वर्षीच्या नुकसानीची भरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरखर्च आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. अशा वेळी विम्याची रक्कम मिळाल्यास मोठा आधार मिळू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


### CHANGE IN NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM SHAIKH MOHAMMED QHASIM DECLIRNG THAT I AM CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER : SHAIKH MOHAMMED QHASIM
TO: SHAIKH MOHAMMED QASIM HENCE FOR THIS DECLARATION HE WILL BE KNOWN BY THIS NAME AND HE WILL USESSHAIKH MOHAMMED QASIM IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY OUR FAMILY AND RELATIVE

**MY SONS OLD NAME:** SHAIKH MOHAMMED QHASIM
**MY SONS NEW NAME:** SHAIKH MOHAMMED QASIM
**ADDRESS:** 27/328 PANCHYAT SAMIT MAGE
BHAGYA NAGAR OSMA NABAD 413501


## कर्जमाफीत सुधारणा न झाल्यास पुन्हा आंदोलन-आ. रोहित पवार

धाराशिव (प्रतिनिधी)- कर्जमाफीत सुधारणा न झाल्यास पुन्हा आंदोलन करणार : आ. रोहित पवार यांचा राज्य सरकारला इशारा

ते म्हणाले, की ३० जूनपासून कर्जमाफीची अंमलबजावणी अपेक्षित असल्याने त्यापूर्वीच शासनाने निर्णयात सुधारणा करावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीव्र लढा उभारला जाईल. पत्रकार परिषदेत आ. पवार म्हणाले की, कर्जमाफी योजनेला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव दिल्याबद्दल समाधान असले तरी लाभार्थ्यांसाठी घालण्यात आलेल्या अटी अन्यायकारक आहेत. यापूर्वीही या मागणीसाठी अन्नत्याग आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी शासनाने मागण्या योग्य असल्याचे मान्य केले, मात्र प्रत्यक्षात त्यानुसार निर्णय घेतला गेला नाही, असा आरोप त्यांनी केला.

जिल्ह्यातील डॉ. पद्मसिंह पाटील आणि खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर या दोन राजकीय परिवारांच्या वर्चस्वामुळे जिल्ह्याला पर्यायी राजकारणाची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस कोणाचीही 'बी टीम' नसल्याचा पुनरुच्चार करत, भविष्यात अशा आरोपांना वाव मिळणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आ. रोहित पवार यांनी कै. पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांडाचाही उल्लेख केला. या प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली असली तरी खरे मारेकरी अद्याप समोर आलेले नाहीत. त्यामुळे सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली या प्रकरणाचा फेरतपास व्हावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही यासाठी पुढाकार घेऊन आपल्या वडिलांच्या हत्येतील सत्य बाहेर आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण: जून अखेरीसही पावसाची दडी, पेरण्या खोळंबल्या

उमरगा (प्रतिनिधी)-रोहिणी नक्षत्राच्या शेवटच्या टप्प्यात ७ जून रोजी झालेल्या पावसाने तालुक्यात केवळ ६४ मिलिमीटर नोंद झाली आहे. त्यानंतर मृग नक्षत्र पूर्णतः कोरडे गेले असून आर्द्रा नक्षत्र सुरू होऊन दोन दिवस उलटले तरी अद्याप पावसाची चिन्हे दिसत नाहीत. जून महिना संपत आला तरी पावसाने दडी मारल्याने शेतकरी मशागतीनंतर आता खरीप पेरणीसाठी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

रोहिणी व मृग नक्षत्रातील बहुतांश दिवस कोरडे गेल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दररोज आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांची निराशा वाढत असून पेरण्या पूर्णतः खोळंबल्या आहेत.

वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे व खते यामुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना पावसाचा विलंब त्यांना अधिक संकटात ढकलत आहे. तालुक्यात फळबागा व ऊस पिकांनाही पाण्याअभावी ताण बसू लागला आहे. भूगर्भातील पाणीपातळी घटत असून विहिरी व बोअरवेल्सची पातळी कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जवळपास ५० टक्के शेतकऱ्यांनी खते व बियाणे खरेदी करून पेरणीची तयारी केली आहे. मात्र अद्याप सर्वदूर पाऊस नसल्याने शंभर टक्के पेरणी शक्य झालेली नाही. त्यामुळे आर्द्रा नक्षत्रात तरी समाधानकारक पाऊस पडेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

पेरणी योग्य पाऊस नसल्याने शेतीचे संकट गडद पावसाच्या दीर्घ विलंबामुळे तालुक्यातील शेती क्षेत्र संकटात सापडले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून बियाणे व खते खरेदी केली आहेत. मात्र पेरणी योग्य पाऊस नसल्याने ही गुंतवणूक अडकून पडली आहे. कोरड्या जमिनीकडे पाहताना शेतकऱ्यांचा धीर सुटत असून, पाऊस न झाल्यास खरीप हंगामासह संपूर्ण आर्थिक गणित कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## महिलांचं दु:ख बाईलाच समजून घ्यावं लागेल: कालिंदी पाटील यांचे प्रतिपादन

उमरगा(प्रतिनिधी)-विधवा, परित्यक्ता महिलांचे दुःख बाईलाच समजून घ्यावे लागेल. महिलांवरती होणारी हिंसकता कमी करणे, शेतकरी महिलांना पुरस्कृत करणे, विधवाना सन्मान आणि प्रतिष्ठा, न्याय देण्यासाठी काम करणे गरजेचे आहे, असे विचार कालिंदी पाटील यांनी व्यक्त केले.

उमरगा तालुक्यातील नाईचाकूर या ठिकाणी महिलांना बियाणांची मदत कार्यक्रमाच्याप्रसंग ी त्या बोलत होत्या. नाम फाउंडेशन, त्रिरत्न महिला बहुउद्देशीय संस्थेच्या विद्यमाने मंगळवारी (दि २३) ९८ शेतकरी महिलांना प्रत्येकी ३० किलो बियाणांचे वाटप करण्यात आले. भूमिपुत्र वाघ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महिला विकास केंद्र नाईचाकूर येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले, माता सावित्रीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दि. २३ जून हा एकल महिला दिन आहे. त्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नाईचाकूर या गावातील एकल महिला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला यांची उपस्थिती होती. यासाठी नाईचाकूर येथील रंजना जमालपुरे, यशोदा पवार, मुक्ता हिंदोळे, सत्यवती इंगळे, नंदा नागणे यांनी केले. या वेळी ग्रामविकास अधिकारी, नागरिक, महिला, पुरुष शेतकरी उपस्थित होते.

खऱ्या अर्थाने आई ही घरकर्ती या वेळी भूमिपुत्र वाघ बोलत म्हणाले, खऱ्या अर्थाने आई ही घरकर्ती आहे. आईच्या नजरेतून सामाजिक बदलाचे अनेक उपक्रम घेण्याची गरज आहे.


### CHANGE IN NAME DECLARATION

Here in this advertisement, I hereby declare that I have changed my name, which was: LAIBA ANAM SAMIUDDIN TO MANIYAR LAIBA ANAM SAMIUDDIN Henceforth, I shall be known by the name MANIYAR LAIBA ANAM SAMIUDDIN, and I will use this name for all purposes in the future.

**OLD NAME:** LAIBA ANAM SAMIUDDIN
**NEW NAME:** MANIYAR LAIBA ANAM SAMIUDDIN
**Address:** Samarth Nagar, Opposite Scan Near Masjid, Osmanabad - 413501, Maharashtra.
Aadhaar No.: 223117623911 Mobile No.: 9699232100

### CHANGE IN NAME DECLARATION

Here in this advertisement, I hereby declare that I have changed my name, which was: MANIYAR RAINA MAHRIN SAMIUDDIN TO RAINA SAMIYODDIN MANIYAR Henceforth, I shall be known by the name RAINA SAMIYODDIN MANIYAR, and I will use this name for all purposes in the future.

**OLD NAME:** MANIYAR RAINA MAHRIN SAMIUDDIN
**NEW NAME:** RAINA SAMIYODDIN MANIYAR
**ADDRESS:**
Samarth Nagar, Opposite ST Stand, Near Masjid,
Osmanabad (Dharashiv) - 413501, Maharashtra.
AADHAAR NO.: 921393642210 MOBILE NO.: 9021190132

### CHANGE IN NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM SHAIKH SHAGUFTA ABDUL MAJED DECLARNIG THAT I AM CHANGEING MY SONS NAME WHICH WAS EARLIER :SHAIKH SHAGUFTA ABDULMAJED TO: SHAIKH SHAGUFTA ABDUL MAJID HENCE FOR THIS DECLARATION HE WILL BE KNOWN BY THIS NAME AND HE WILL USES SHAIKH SHAGUFTA ABDULMAJIIN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY OUR FAMILY AND RELATIVE

**MY SONS OLD NAME:** SHAIKH SHAGUFTA ABDUL MAJED
**MY SONS NEW NAME:** SHAIKH SHAGUFTA ABDUL MAJID
**ADDRESS:** 27/328 BHAGYA NAGAR SA MTA
COLONY OSMANABAD 413501



## लातूर समाचार धाराशिव बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649